# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १८७-२२ दिनांक :- २०/०६/२०२२

## पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये कर्तव्यास असणाऱ्या स्टाफसाठी ठाणे येथून विशेष बससेवा सुरु.

दिनांक ०१/१०/२०२० रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची निर्मीती करण्यात आली असून नव्याने स्थापन झालेल्या शांतीगार्डन, मिरारोड येथील पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये ठाणे तसेच पालघर जिल्हयातून प्रवास करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. पालघर जिल्हयातून प्रवास करुन आयुक्त कार्यालयामध्ये येणारे स्टाफ हे रेल्वे मार्गाने येवू शकतात मात्र ठाणे, माजीवाडा, कासारवडवली येथून येणाऱ्या स्टाफला शहर बससेवा किंवा खाजगी वाहनांचा वापर करुन यावे लागत असून खाजगी वाहतूक सेवांचा लाभ घेतांना जास्त वाहतूक भाडे दयावे लागते. उपरोक्त ठाणे, माजीवाडा, व इतर भागातून येणाऱ्या स्टाफच्या प्रवासाची गरज लक्षात घेवून ठाणे स्टेशन ते पोलीस आयुक्त कार्यालय अशी बससेवा सुरु करण्यात यावी याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दिनांक २०/०६/२०२२ रोजीपासून मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये येणाऱ्या स्टाफसाठी गायमुखमार्गे ठाणे स्टेशन ते शांतीगार्डन येथील पोलीस आयुक्त कार्यालयापावेतो शहर बससेवा सुरु करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त कार्यालय व मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी ही बससेवा सुरु करण्यात आली आहे. सदरची बस सकाळी ०८:४५ वाजता ठाणे स्टेशन येथून पोलीस आयुक्त कार्यालय, शांतीगार्डन मिरारोड करिता व परत सायंकाळी १८:३० वाजता पोलीस आयुक्त कार्यालय येथून ठाणे स्टेशन करिता उपलब्ध असणार आहे. दिनांक २०/०६/२०२२ रोजी पहिल्या दिवशी पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये आलेल्या स्टाफ तसेच बसचालक व वाहक यांचे मा. श्री. सदानंद दाते यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले आहे.

